दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १५४ • RNI : MAHMAR/2023/87818 • सोमवार दि.७ एप्रिल २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# डीपेक्स-२०२५ मध्ये विद्यार्थ्यांच्या नवकल्पनांना प्रोत्साहन: स्टार्टअप साठी १०० कोटींचा निधी जाहीर

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**पुणे (वृत्तसंस्था):** कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्या माध्यमातून नवकल्पनांना चालना देण्यासाठी इन्यक्यूबेशन केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. अशा कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी भांडवल पुरविण्याच्या दृष्टीने राज्याने भारतीय लघू उद्योग विकास बँकेसोबत १०० कोटी रुपयांचा निधीअंतर्गत निधी तयार केला आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, विद्यार्थ्यांनो, आपल्या प्रकल्पांपुरते मर्यादित न राहता कल्पनामधील त्रुटी शोधा, यशस्वी उद्योजकांशी संवाद साधून त्यांच्या मागणीप्रमाणे व्यवसायिक आणि कौशल्याधिष्ठित मॉडेल तयार करा, याकरीता केंद्र व राज्य शासन आपल्या पाठीशी उभे राहील, अशी ग्वाहीदेखील त्यांनी विद्यार्थ्यांना दिली.सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ मैदान, शिवाजीनगर येथे कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, सीओईपी विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद महाराष्ट्र व गोवा आणि सृजन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'डीपेक्स-२०२५' राज्यस्तरीय चलप्रतिकृती प्रदर्शनाला दिलेल्या भेटीप्रसंगी ते बोलत होते. यावेळी उच्च तंत्र व शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, आमदार सुनील कांबळे आदी उपस्थित होते.

फडणवीस म्हणाले, गेल्या दशकापासून तरुणांमधील ज्ञान, कौशल्य आणि त्यांच्यामधील नाविन्यता एकत्रित मांडण्याची संधी 'डीपेक्स'च्या माध्यमातून मिळत आहे. या मंचावरील संकल्पना विविध प्रयोगामध्ये रूपांतरित झाल्या आहेत.तुमच्या मनातील कल्पना प्रत्यक्षात उतरविण्याची संधी तंत्रज्ञानाने उपलब्ध होत आहे. आज छोटीशी कल्पना व्यवसायिक संधीमध्ये परावर्तित होत असल्याचे आपल्याला बघायला मिळते. महाराष्ट्र ही स्टार्टअप जननी आहे. तसेच स्टार्ट अप इंडियाचा अहवालानुसार देशात सर्वाधिक स्टार्टअप आणि त्यामाध्यमातून होणारी गुंतवणूक असल्यामुळे देशाची स्टार्ट अप राजधानी ही महाराष्ट्र आहे. देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मांडलेल्या 'विकसित भारत -२०४७' या संकल्पेच्या मुळाशी देशातील युवाशक्ती व नवोन्मेषक होते. हीच युवाशक्ती देशाला विकासाकडे नेईल. 'मेक इन इंडिया-मेक फॉर वर्ड' च्या माध्यमातून इतर कुठल्याही देशाकडे नसलेले विविध उच्च प्रतीचे साहित्य आपल्या देशात तयार होत आहे. संरक्षण क्षेत्रात सुमारे ३० ते ३५ हजार कोटी रुपयांचे संरक्षणसाहित्य भारत देश जगाला निर्यात करीत आहे. त्यामुळे विकसित भारताचे स्वप्न बघतांना स्वावलंबी भारत, स्वयंपूर्ण भारत आणि आत्मनिर्भर भारत अत्यंत महत्वाचा आहे.आत्मनिर्भर भारताकडे जात असताना तंत्रज्ञानयुक्त स्टार्टअप आणि त्यामाध्यमातून नाविन्यता महत्वाची आहे. यामुळे देशात आज विविध यशस्वी स्टार्टअप बघायला मिळतात.प्रत्येक टाकाऊ वस्तू ही उर्जा निर्मितीचे साधन आहे, त्यामुळे विविध नवनवीन प्रयोग,स्र्टाटअप आणि तंत्रज्ञानाद्वारे त्यावर प्रकिया करुन ऊर्जा निर्मिती भर देण्यात आहे, यामुळे रोजगाराला चालना मिळत आहे.टाकाऊ वस्तूपासून पुनर्वापर त्यामाध्यमातून शाश्वत विकास हेच विकसित भारताचे उद्दिष्ट आहे.स्टार्टअपच्या परिसंस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा नाविन्यतेवर भरआज टियर २ आणि टियर ३ शहरामधील औद्योगिक संस्था, पॉलिटेक्निक, अभियांत्रिकी शाखेत विद्यार्थी मोठ्याप्रमाणात स्टार्टअप परिसंस्थेच्या माध्यमातून नाविन्यतेवर भर देत आहे. ते गटस्वरुपात कल्पना उदयास आणून इज ऑफ लिव्हिंग, इज ऑफ बिझिनेस तयार होतात. इज ऑफ लिव्हिंगसोबतच व्यवसायिक कल्पनेत परिवर्तन केल्यास स्वत:सोबतच अनेकांना रोजगार उपलबध् करुन देता येते असे त्यांनी सांगितले.



## शिरूरमध्ये महिलांच्या गळ्यातील दागिने जबरीने ओढणाऱ्या दोन चोरट्यांना अटक

**शिरूर । प्रतिनिधी**



शिरूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत महिलांच्या गळ्यातील दागिने जबरीने ओढणाऱ्या दोन चोरट्यांना शिरूर पोलिसांनी अटक केली असून, या आरोपींकडून पाच गुन्हे उघडकीस आले आहेत. गणेश सुनील गायकवाड (वय २१) आणि करण नरसी वाघेला (वय २४) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून, त्यांना अहिल्यानगर येथून अटक करण्यात आली आहे. या दोघांनी त्यांच्या साथीदार साजिद सलीम शेख (फरार) याच्या मदतीने शिरूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत आणखी चार गुन्हे केल्याची कबुली दिली आहे.

२६ जानेवारी २०२५ रोजी जोशीवाडी येथे एका महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र जबरीने ओढून चोरी करण्यात आली होती. या घटनेनंतर शिरूर पोलिसांनी तपास सुरू करत सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपींची ओळख पटवली आणि अटक केली. तपासादरम्यान आरोपींनी चोरी केलेले दागिने त्यांच्या साथीदार साजिद सलीम शेख याच्याकडे दिल्याचे निष्पन्न झाले. शेख याने ते दागिने त्याच्या आजारी वडिलांच्या उपचारासाठी सोनाराकडे ठेवले होते. पोलिसांनी संबंधित सोनाराकडून हे दागिने हस्तगत केले असून, साजिद शेख सध्या फरार आहे. त्याचा शोध सुरू आहे.या आरोपींविरोधात गु. रजि. क्र. ६७/२०२५, २१४/२०२५, ८२५/२०२४, ५७४/२०२४ आणि ९५३/२०२४ या पाच गुन्ह्यांची नोंद असून त्यामध्ये भा.दं.वि. कलम ३०४(२), ३९२, ३४ आदींचा समावेश आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले आणि पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण, पोलीस हवालदार नाथसाहेब जगताप, पोलीस अंमलदार विजय शिंदे, नितेश थोरात, नीरज पिसाळ, सचिन भोई, रवींद्र आव्हाड, निखिल रावडे आणि अजय पाटील यांच्या पथकाने केली.

## शेवटचा दिवस ठरला कामाचा
## मजुराच्या मृत्यूने गावात शोककळा

**चिमूर । शेषराव राऊत**



पोटासाठी घराबाहेर पडलेला माणूस पुन्हा घरी परतलाच नाही चिमूर तालुक्यातील साठगाव मायनर वितरण कालव्याच्या कामावर कार्यरत असलेल्या एका मजुराचा अचानक मृत्यू झाल्याने चिचाळा कुणबी गावावर शोककळा पसरली आहे.

प्रशांत मधुकर येवले (वय ३७), राहणार चिचाळा कुणबी, असे मृत मजुराचे नाव आहे. ५ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास कालव्याच्या कामाच्या ठिकाणी त्याचा मृतदेह आढळून आला. तो सकाळी नेहमीप्रमाणेच कामावर गेला होता आणि ट्रॅक्टरने कालव्यावर पाणी मारण्याचे काम करत होता. मात्र सायंकाळी तो मृत अवस्थेत आढळून आला.घटनेची माहिती मिळताच कुटुंबीयांनी घटनास्थळी धाव घेतली. शंकरपूर पोलीस चौकीचे पोलीस उपनिरीक्षक रवींद्र वाघ, हवालदार ननावरे, शिपाई घोडमारे यांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह ग्रामीण रुग्णालय, चिमूर येथे पोस्टमार्टमसाठी पाठवला.मृत्यूचे नेमके कारण अस्पष्ट असले तरी त्याबाबत परिसरात चर्चा रंगल्या आहेत. दुसऱ्या दिवशी म्हणजे ६ एप्रिल रोजी सकाळी दहा वाजता गावकऱ्यांनी व नातेवाईकांनी मृतदेह पुन्हा घटनास्थळी नेला. जोपर्यंत कंत्राटदाराकडून आर्थिक मदत मिळत नाही, तोपर्यंत प्रेत उचलणार नाही, अशी भूमिका घेतल्यामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.अखेर ब्रह्मपुरी येथील ठेकेदार गौड यांनी दीड लाख रुपयांचा धनादेश व दहा हजार रुपये रोख रक्कम दिल्यानंतर मृतदेह उचलण्यात आला. दुपारी एक वाजता प्रशांतचे चिचाळा कुणबी येथे शोकमग्न वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.या दुर्दैवी घटनेने मजुरांच्या असुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## निप्पॉन डेंड्रो प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांचा शासन स्तरावर पाठपुरावा करणार-शैलेश केलझरकर

**भद्रावती । प्रतिनिधी**

निप्पॉन डेंड्रो प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीच्यावतीने भद्रावती तहसील कार्यालयासमोर २४ मार्चपासून सुरू असलेल्या धरणे आंदोलनाचा आज तेरावा दिवस होता. यावेळी युवासेना चंद्रपूर जिल्हा प्रमुख शैलेश केलझरकर यांनी आंदोलनस्थळी भेट देत प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांना आपला पाठिंबा दर्शवला. तसेच या मागण्यांचा शासन व प्रशासन स्तरावर ठोसपणे पाठपुरावा केला जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.या भेटीदरम्यान युवासेनेचे वरोरा विधानसभा समन्वयक तथा ढोरवासा ग्रामपंचायत चे उपसरपंच मुनेश्वर बदखल, चंद्रपूर तालुका सचिव अक्षय पवार यांचीही उपस्थिती होती.

### युवासेनेचा आंदोलनाला पाठिंबा



शैलेश केलझरकर यांनी आंदोलनस्थळी आंदोलक शेतकऱ्यांशी संवाद साधताना निप्पॉन डेंड्रो प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांची गांभीर्याने दखल घेतली जाईल, असे सांगितले. या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत लवकरच एक महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात यावी, यासाठी प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या आंदोलनात प्रकल्पग्रस्तांकडून प्रामुख्याने प्रति एकर दहा लाख रुपये अनुदान देणे, प्रकल्पग्रस्त, कंपनी व एमआयडीसी यांच्यात त्रिपक्षीय करार करणे, तसेच प्रकल्पग्रस्तांना नोकरीची हमी देणे अशा मागण्या करण्यात येत आहेत. या मागण्यांकडे प्रशासन आणि शासन स्तरावर अद्यापही ठोस निर्णय घेण्यात आलेला नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष आहे.आंदोलनाच्या तेराव्या दिवशी युवासेनेच्या जिल्हा प्रमुखांनी दिलेला पाठिंबा आंदोलनाला बळ देणारा ठरणार असून, प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी आता अधिक व्यापक स्तरावर लढा उभारला जाणार आहे.

## वैजापूर वस्तीगृहात विद्यार्थ्याला अमानुष मारहाण; पालकांनी केली पोलीस ठाण्यात तक्रार
### कॅमेरे फोडल्याच्या संशयावरून विद्यार्थ्यांवर शिक्षकांचा अन्याय?

**वैजापूर । अर्जुन शिंदे**

वैजापूर येथील शासकीय निवासी वस्तीगृहात कबीर राजू निखाळे या इयत्ता नववीतील विद्यार्थ्यावर अमानुष मारहाणीची घटना समोर आली असून, या प्रकरणी पालकांनी वैजापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

घटना ४ एप्रिल रोजी संध्याकाळी घडली. वस्तीगृहातील सीसीटीव्ही कॅमेरे अज्ञात व्यक्तींकडून फोडले गेले होते. विद्युत पुरवठा खंडित असल्यामुळे कोण कॅमेरे फोडतो आहे हे स्पष्ट झाले नाही. मात्र, दुसऱ्या दिवशी नववी इयत्तेतील ८ ते १० विद्यार्थ्यांना कार्यालयात बोलावून, कॅमेरे तुम्हीच फोडले असा आरोप करत त्यांना मुख्याध्यापक माळी सर आणि अधीक्षक गव्हाणे सर यांनी तब्बल दीड तास खाली पाडून मारहाण केली, असा आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे.



या मारहाणीबाबत पालकांना सायंकाळी फोन करून २० हजार रुपयांची नुकसानभरपाई मागण्यात आली. मात्र, मुलांनी कॅमेरे फोडलेच नाहीत असा निर्वाळा पालकांनी दिला आणि पैसे देण्यास नकार दिला. त्यामुळे त्यांनी थेट पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली.या प्रकरणी वैजापूर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली गेली असून, पुढील तपास सुरू आहे.

# स्विफ्ट डिझायर कार आणि सिमेंट मिक्सर हायवा यांची समोरासमोर धडक; ५ जण गंभीर जखमी

## अंजना सागर प्रकल्पाजवळील वळणावर अपघात; एअरबॅगमुळे जीवितहानी टळली

**पिशोर । जावेद शेख**

पिशोर जवळील अंजना सागर मध्यम पळशी प्रकल्पाजवळील बर्फ कारखान्याजवळ रविवारी (दि. ६ एप्रिल) दुपारी दोनच्या सुमारास स्विफ्ट डिझायर कार आणि सिमेंट मिक्सर हायवा यांच्यात समोरासमोर जोरदार धडक होऊन पाच जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, सिल्लोडहून कन्नडमार्गे सुसाट वेगाने जाणारी सफेद रंगाची स्विफ्ट डिझायर कार (क्र. MH 19 CZ 8016) आणि समोरून कन्नडहून पिशोरकडे येणारी सिमेंट मिक्सर हायवा (क्र. MH 20 GC 4433) यांच्यात अंजना प्रकल्पाजवळील वळणावर भीषण अपघात झाला. धडक इतकी तीव्र होती की कारचा समोरील भाग अक्षरशः चुरडून गेला. मात्र कारमधील एअरबॅग्स उघडल्याने मोठी जीवितहानी टळली.

या अपघातात स्विफ्ट डिझायर कारमधील अशोक निवृत्ती बकल (वय ६०), संतोष मुंजाजी होंगडे (वय ४०), संतोष आहेर (वय २३), हनुमान वदिराव (वय ३५), आणि शामराव (वय ५०, सर्व रा. हिंगोली) हे प्रवासी गंभीर जखमी झाले. अपघातानंतर सिमेंट मिक्सर हायवा रस्त्याच्या खाली घसरून गेली असून चालक घटनास्थळावरून फरार झाला आहे.

जखमींना तत्काळ मदत करण्यासाठी पिशोरचे उपसरपंच बाळासाहेब जाधव, सामाजिक कार्यकर्ते राजू मोकासे, नवाब शेठ यांनी पुढाकार घेतला. त्यांनी पिशोर पोलिसांना व ग्रामीण रुग्णालयाशी संपर्क साधून रुग्णवाहिका बोलावली.घटनास्थळी सपोनि शिवाजी नागवे, बिट जमादार संजय दराडे, गजानन कऱ्हाळे यांनी भेट देऊन पंचनामा केला. सर्व जखमींना पिशोर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले, तेथे डॉ. गिरी यांनी प्राथमिक उपचार करून त्यांना पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे हलवले.या प्रकरणाची नोंद पिशोर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, पुढील तपास सपोनि शिवाजी नागवे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.



# राष्ट्रीय पातळीवरील विज्ञान प्रदर्शनासाठी सागर बोंबलेची निवड माध्यमिक शिक्षण विभागाकडून ६५,००० रुपयांची रोख मदत

**पिशोर । जावेद शेख**

ढोरकिन येथील मानसिंग पवार कनिष्ठ महाविद्यालयाचा विद्यार्थी सागर ज्ञानेश्वर बोंबले याने विज्ञानाच्या क्षेत्रात मोठी झेप घेतली असून त्याची निवड राष्ट्रीय पातळीवरील विज्ञान प्रदर्शनासाठी झाली आहे. नुकतेच अमरावती येथे झालेल्या राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात सागरने माध्यमिक गटातून द्वितीय क्रमांक मिळवत महाराष्ट्रातून निवड मिळवली आहे.राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली व महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सागरच्या या यशासाठी त्याला माध्यमिक शिक्षण विभागाकडून विज्ञान साहित्य व इतर तयारीसाठी ६५,००० रुपयांची रोख मदत जाहीर करण्यात आली.

मराठवाडा साहित्य परिषदेच्या सभागृहात झालेल्या सन्मान समारंभात जिल्हा शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर पानसरे यांनी सागरला गौरवित करत सांगितले की, सागरच्या राष्ट्रीय स्तरावरील सहभागासाठी लागणारा सर्व खर्च माध्यमिक शिक्षण विभाग उचलणार आहे.या गौरव समारंभाला उपशिक्षणाधिकारी सिताराम पवार, शिक्षण विस्तार अधिकारी दिलीप शिरसाठ, जयेश चौरे, संगीता सावळे, रमेश ठाकूर, डॉ. बी. जी. गायकवाड, डॉ. ऋषिकेश कांबळे, डॉ. संजय गायकवाड, रायभान जाधव, डॉ. शिवाजी हुसे, दत्ता मोरस्कर, सुनील आदिक, सुनिता वाघ आदी मान्यवर उपस्थित होते.सागरच्या यशात महाविद्यालयातील प्रा. महेश कुलकर्णी यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. त्याच्या या यशाबद्दल संपूर्ण जिल्ह्यातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.



## बाळराजे पाटील यांनी मोहोळ तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकपुर्व तयारीचे रणसिंग फुंकले

**मोहोळ । प्रतिनिधी**

आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मोहोळ तालुक्यातील सर्वच जिल्हा परिषद आणि पंचायत समिती गटांतील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थांशी संवाद साधण्यासाठी दिनांक ६ ते ११ एप्रिल दरम्यान बैठकीचे आयोजन करण्यात आल्याची माहिती लोकनेते कारखान्याचे चेअरमन बाळराजे पाटील यांनी दिली आहे. रविवारी सायंकाळी ६ वाजता पोखरापुर जिल्हा परिषद गटातील खवणी येथे, मंगळवार दिनांक ८ रोजी आष्टी गटातील गिड्डेवाडी येथे, दिनांक १० एप्रिल रोजी कुरुल गटातील सोहाळे येथे तर १५ एप्रिल



रोजी पेनूर गटातील शेजबाभुळगाव येथे आणि १९ एप्रिल रोजी नरखेड गटातील भोयरे येथे सायंकाळी ६ वाजता बैठका पार पडणार आहेत.या बैठकीत आगामी निवडणुकांमध्ये पक्षाच्या तयारीचा आढावा घेतला जाणार असून, स्थानिक पातळीवरचे प्रश्न, विकासकामे, संघटनात्मक मजबुती यावर चर्चा होणार आहे. यावेळी सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन बाळराजे पाटील आणि सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील यांनी केले आहे.या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अस्लम चौधरी, भारत सुतकर, प्रकाश चवरे, बाळासाहेब भोसले, दत्तात्रय पवार, दिलीप पाटील, राजाभाऊ गुंड-पाटील, ज्योत्सना पाटील, शुभांगी लंबे, राहुल मोरे, कुंदन धोत्रे, नागराज पाटील, मुकुंद आवताडे, यशोदा कांबळे आदी पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.

## साईच्या पावन भूमीत शिर्डीत भव्य दिव्य पुरस्कार सोहळा 3 मे रोजी

**अहिल्यानगर । वजीर शेख**

ओम साई विकास प्रतिष्ठान व बी.बी.सी. फिल्म प्रोडक्शन महाराष्ट्र राज्य निर्मित 'महाराष्ट्र साई कलारत्न समाजभूषण पुरस्कार २०२५' सोहळा दिनांक ३ मे २०२५ रोजी (शनिवार) सकाळी १० वाजता शिर्डी येथील थ्री स्टार हॉटेल शांतीकमल येथे संपन्न होणार आहे. या भव्य व दिव्य सोहळ्यात राज्यभरातील विविध ३६ क्षेत्रांतील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या १५१ मान्यवरांचा गौरव करण्यात येणार आहे. सन्मानप्राप्त व्यक्तींना ट्रॉफी, सन्मानपत्र, गोल्ड मेडल, फेटा, शाल, गुलाबपुष्प आणि थैली देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.कार्यक्रमाचे संस्थापक



अध्यक्ष सुदाम संसारे यांनी आवाहन केले आहे की, पुरस्कार प्राप्त मान्यवरांनी वेळेवर उपस्थित राहावे. लांबून येणाऱ्या मान्यवरांसाठी राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. विशेष आकर्षण म्हणून एका लकी ड्रॉचे आयोजन करण्यात आले असून, त्यात १२ पेठणी साड्या व १२ ड्रेससाठी कपड्यांचे वितरण करण्यात येणार आहे. हे पुरस्कार चंद्रमा फाउंडेशन प्रस्तुत कलाकार स्टुडिओ व अभिनय अकादमी, चेंबूर - मुंबई यांच्या सौजन्याने, तसेच प्रसिद्ध हॉटेल उद्योजक व समाजसेवक किशोर कालडा (संगमनेर) यांच्या सौजन्याने प्रदान केले जाणार आहेत.पुरस्कारांचे वितरण सिने सृष्टीतील मान्यवर सेलेब्रिटींच्या हस्ते होणार असून, सोहळ्यात विविध क्षेत्रातील नामवंत पाहुणे उपस्थित राहणार आहेत.

## अर्थसंकल्पीय अधिवेशनात मतदारसंघा साठी किती निधी मिळाला;आधी उत्तर द्या

### संजयमामांचे आमदार पाटलांना जाहीर आव्हान

**सोलापूर । प्रतिनिधी**

नुकत्याच पार पडलेल्या राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात करमाळा मतदारसंघासाठी किती निधी मिळाला, याचे उत्तर आधी जनतेला द्यावे, असे जाहीर आवाहन माजी आमदार संजयमामा शिंदे यांनी विद्यमान आमदार नारायण पाटील यांना केले आहे.आदिनाथ सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पारेवाडी येथे आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. मार्चमधील अर्थसंकल्प हे वर्षभराच्या निधी नियोजनासाठी महत्त्वाचे असते, पुरवणी अर्थसंकल्पाला मर्यादा असते. मात्र चालू अधिवेशनात आमदार नारायण पाटील करमाळा मतदारसंघासाठी दमडीही मिळवू



शकले नाहीत, हे त्यांच्या कार्यक्षमतेवर बोट ठेवणारे आहे, अशी टीका शिंदे यांनी केली.

गेल्या पाच वर्षांतील हे पहिलंच अधिवेशन आहे, ज्यात मतदारसंघाला विकासासाठी रुपयादेखील मिळवता आला नाही. माझ्या कार्यकाळात सुरू केलेली बहुसंख्य विकासकामे आजही सुरू आहेत. मात्र, त्यात टक्केवारीसाठी अडथळे निर्माण करणे, कामे बंद पाडणे हे प्रकार विद्यमान आमदार आणि त्यांच्या सहकाऱ्यांकडून सुरू आहेत, असा आरोप त्यांनी केला. दहिगाव योजना तीन महिन्यांपासून बंद असून, पाईप जाळण्याचा प्रकार कोणाच्या सांगण्यावरून झाला हे आता उघड झाले आहे. राजकारण हे पोटभरण्याचं साधन बनवलं जात आहे. त्यामुळे आता शासनदरबारी पत दाखवा, निधी आणा, त्यातून पैसे खा, पण सुरू असलेली कामं बंद पाडून जनतेचा तळतळाट घेऊ नका, असा खणखणीत इशारा शिंदे यांनी दिला.उजनी धरणात अवघे २० टक्के पाणी शिल्लक असून, दहिगावचे पाणी अजून टेल भागात पोहोचलेले नाही. तोंड पाहून पाणी देणे, मतांची आकडेवारी पाहून गावांना पाणी नाकारणे, हे पाप लोकप्रतिनिधींनी करू नये. जनता आता आंदोलनाच्या उंबरठ्यावर आहे, असा इशाराही त्यांनी दिला.

## जयप्रकाश बिले पब्लिक स्कूलच्या चिमुकल्यांनी पदवी प्रदान कार्यक्रमात जिंकली मान्यवरांची मने



**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील झरे येथील जयप्रकाश बिले पब्लिक स्कूलतर्फे सिनियर केजी पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांचा पदवी प्रदान समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. या वेळी चिमुकल्यांनी इंग्रजीमधून सुंदर मनोगते सादर करून पालक व उपस्थित मान्यवरांची मने जिंकली.

कार्यक्रमासाठी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे टाळ्यांच्या गजरात कौतुक करण्यात आले. संस्थेच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे व शालेय साहित्य देण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून सुप्रसिद्ध लेखिका आणि पुरस्कार विजेत्या अंजली श्रीवास्तव, तर प्रमुख पाहुण्या म्हणून झरे गावच्या नूतन सरपंच आणि कमलाई स्किल डेव्हलपमेंट करमाळाच्या संस्थापिका मंजुश्री मुसळे उपस्थित होत्या. दोन्ही मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत प्रेरणादायी मार्गदर्शन दिले.कार्यक्रमात संस्थेच्या संचालिका स्वाती बिले, मुख्याध्यापिका अमृता परदेशी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालक वर्ग मोठ्या उत्साहाने सहभागी झाला. सूत्रसंचालन संचालक कादगे यांनी केले, तर आभार प्रदर्शन वर्गशिक्षिका रजनी परदेशी यांनी मानले.

## भारतीय जनता पक्षाचा ४५ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

### संताजी नगर, करमाळा येथे ध्वजारोहणा नंतर ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सन्मान

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा येथील संताजी नगरमधील जनसंपर्क कार्यालयात भारतीय जनता पक्षाचा ४५ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने ध्वजारोहण करून राष्ट्रसेवेच्या व पक्षनिष्ठेच्या कार्याची आठवण करून देण्यात आली.

या कार्यक्रमात भाजपच्या ज्येष्ठ सदस्य आनंदी ताई पाटील व प्रदीप देवी यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास करमाळा शहराचे माजी अध्यक्ष संजय अण्णा घोरपडे, जिल्हा उपाध्यक्ष शशिकांत पवार, किसान मोर्चा जिल्हा सरचिटणीस नरेंद्रजी ठाकूर, प्रज्ञा सेलचे जिल्हाध्यक्ष सुहास घोलप, शहर सरचिटणीस जितेश कटारिया, सचिन चव्हाण, संतोष कांबळे,



बाळासाहेब कुंभार, महिला अध्यक्ष रेणुका राऊत, शिवाजी कुंभार तसेच इतर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## झकपक इंग्रजी शाळांपेक्षा संस्कारांची शिदोरी अधिक महत्त्वाची-प्रा.सत्यवान दाढे

### चिखली जि.प.शाळेतील आठवीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ भावनिक वातावरणात पार पडला

**मोहोळ । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या मन, मेंदू आणि मनगटाचा सर्वांगीण विकास करत स्वच्छंदी शिक्षणाचा खरा आनंद जिल्हा परिषद शाळांमध्येच मिळतो. आज झकपक इंग्रजी माध्यमाच्या शाळांची क्रेझ वाढत असली तरी जिल्हा परिषद शाळांतील उच्चशिक्षित शिक्षकांकडून मिळणारे संस्कार हेच खरे जीवनाचे शस्त्र ठरतात, असे मत प्रा. सत्यवान दाढे यांनी व्यक्त केले.



चिखली (ता. मोहोळ) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ व पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी सदिच्छा समारंभ नुकताच संपन्न झाला. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. सत्यवान दाढे तर अध्यक्षस्थानी कोन्हेरी केंद्राचे प्रभारी केंद्रप्रमुख रुषी जगताप होते.कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. मुख्याध्यापक विष्णू दाढे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. वर्गशिक्षक भिमाशंकर राशीनकर यांनी प्रास्ताविक सादर केले. विद्यार्थिनी सरस्वती गवळी आणि मानवी सिरसट यांनी आपल्या भाषणातून शाळा आणि शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.यावेळी शिक्षक विष्णू दाढे, राजेंद्र बनसोडे, दगडू सरक, रवि चव्हाण, अर्चना घुगे यांनी विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष श्रीनिवास यादव, शिक्षिका मालन चेंडगे, सर्व शिक्षक, शिक्षिका आणि विद्यार्थी उपस्थित होते.आठवीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेस गार्डन पाईप भेट देत झाडांना पाणी देण्याच्या उपक्रमात सहभागाचे स्मरण ठेवले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन रवि चव्हाण यांनी केले.

## सावित्री-जिजाऊंच्या प्रेरणेने महिलांना नवे बळ; समता परिषदेच्या कार्यक्रमात उत्साहात प्रमाणपत्र वाटप व कार्यकारिणी निवड

**सोलापूर । प्रतिनिधी**

क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले आणि राष्ट्रमाता माँ जिजाऊ साहेब यांच्या जयंतीनिमित्त अखिल भारतीय समता परिषद महिला आघाडी, तालुका व शहर संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात महिलांना आत्मभान व प्रेरणा देणारा सोहळा पार पडला. महिलांना मोफत शिवणक्लासचे प्रमाणपत्र वाटप आणि नवीन कार्यकारिणी निवडीच्या माध्यमातून सक्षमीकरणाचा नवा अध्याय सुरू करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंजली श्रीवास्तव होत्या. मातृत्वाचा आणि शिक्षणाचा आदर्श सावित्रीमाईंकडून घेऊन महिलांनी सक्षमपणे उभे राहिले पाहिजे, असे त्यांनी सांगितले. या उपक्रमाचे विशेष कौतुक करत त्यांनी समता परिषदेच्या कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले.मार्गदर्शनपर विचार व्यक्त करताना सन्माननीय गणेश (भाऊ) करे पाटील यांनी माँ जिजाऊंचे संस्कार आणि महात्मा फुलेंच्या सामाजिक कार्यावर प्रकाश टाकत, युवकांनी यापासून प्रेरणा घ्यावी असे सांगितले. वैज्ञानिक दृष्टिकोन अंगीकारत समाजात जागृती निर्माण करण्याचे आवाहनही त्यांनी केले.आरोग्य सल्लागार डॉ. कविता कांबळे यांनी महिलांच्या आरोग्यविषयक समस्यांवर उपाय सांगितले, तर डॉ. सोमनाथ बोराटे यांनी सरकारी व संस्थात्मक योजना महिलांपर्यंत कशा पोहोचवाव्यात यावर सविस्तर मार्गदर्शन केले.

इतिहासकार जगन्नाथ जाधव यांनी महात्मा फुले, छत्रपती शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांचा इतिहास सहज भाषेत समजावून सांगितला. स्वातीताई माने यांनी आपल्या कवितांमधून व विचारांमधून महिलांना मानसिक बळ दिले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिता राऊत यांनी तर प्रस्ताविक अश्विनी जाधव-माने यांनी केले. आभार प्रदर्शन शितल शिंदे यांनी केले. या कार्यक्रमाला नवनाथ मोहोळकर,मधुकर शिंदे, सुरेखा जाधव,रेणुका मोहोळकर यांची प्रमुख उपस्थिती होती.संपूर्ण कार्यक्रम हा उत्साहात आणि सकारात्मक ऊर्जेने परिपूर्ण वातावरणात पार पडला. महिलांच्या सक्षमीकरणासाठी हा एक प्रेरणादायी पाऊल ठरला.



# जुनी पेन्शन योजना पुन्हा चर्चेत; शिक्षण क्षेत्राला न्यायालयाच्या आदेशामुळे दिलासा

## पुण्यात हजारोंच्या उपस्थितीत कार्यशाळा; आशेचा नवा किरण

**पुणे । दत्तात्रय गवळी**

राज्यातील २००५ पूर्वी नियुक्त व त्यानंतर १०० टक्के अनुदानावर आलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी जुनी पेन्शन योजना (जझड) पुन्हा एकदा आशेचा किरण घेऊन आली आहे. २७ फेब्रुवारी २०२५ रोजी मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानंतर ६ एप्रिल २०२५ रोजी पुण्यात मौलाना अब्दुल कलाम आझाद मेमोरियल हॉल येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेला राज्यभरातून हजारो शिक्षकांनी उपस्थिती लावली.कार्यशाळेला पुणे जिल्ह्याचे आदरणीय नेते विजय कचरे अध्यक्षस्थानी होते. तसेच शिक्षक नेते सुदेश जाधव (कोल्हापूर), दिलीप डोंगरे (संगमनेर), सुभाष जावळे, शिवाजीराव कामठे, राज मुजावर, संभाजी पडवळ, किशोर दीसले, रामभाऊ पाडोळे यांसारखे अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. कल्याण वाघ यांनी केले तर सूत्रसंचालन आशुतोष पवार यांनी केले.




मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने स्पष्ट आदेश दिला आहे की, १ नोव्हेंबर २००५ पूर्वी १००% अनुदानित शाळांमध्ये नियुक्त शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, अर्धवेळ शिक्षक व ग्रंथपाल यांना जुनी पेन्शन योजना लागू असेल. तसेच ३१ ऑक्टोबर २००५ पर्यंत अनुदानित पदांवर नियुक्त झालेल्यांनाही योजनेचा लाभ मिळणार आहे.सदर निर्णय न्या. रवींद्र घुगे व न्या. अश्विन भोबे यांच्या खंडपीठाने दिला असून, यामध्ये अनेक वर्षांपासून संघर्ष करणाऱ्या शिक्षक कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. या निर्णयावर आधारित प्रस्ताव ३० सप्टेंबर २०२५ पूर्वी शिक्षण उपसंचालकांकडे सादर करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.या याचिकेवर न्याय मिळवून देण्यात वकील सुरेश पाकळे यांचे मोलाचे योगदान असून, त्यांनी आता २००५ पूर्वी विनाअनुदानित किंवा अंशतः अनुदानित पदांवर नियुक्त कर्मचाऱ्यांनाही प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन केले आहे. या माध्यमातून अधिकाधिक कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू होण्याची शक्यता आहे.या कार्यशाळेमुळे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमध्ये नव्या आशेचा संचार झाला असून, महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन कोर कमिटी आणि शिक्षण संघर्ष संघटनेच्या पुढाकारामुळे जुनी पेन्शन योजनेसाठीचा लढा अधिक प्रभावीपणे पुढे जात आहे

# अनगरमध्ये श्रीराम जन्मोत्सव भक्तिमय वातावरणात साजरा

## ह.भ.प.आनंद महाराज गोसावी यांचे सुश्राव्य कीर्तन; महाप्रसादाने झाली सांगता

**मोहोळ । प्रतिनिधी**

अनगर येथील बाजारतळाशेजारी असलेल्या श्रीराम मठात मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम जन्मोत्सव सोहळा माजी आमदार राजन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात साजरा करण्यात आला.

उत्सवाची सुरुवात सकाळी पूजारी बबन स्वामी आणि काका स्वामी यांच्या हस्ते श्रीराम मूर्तींच्या पूजनाने झाली. त्यानंतर सोलापूर येथील ह.भ.प. आनंद महाराज गोसावी यांनी श्रीराम जन्मावर आधारित भावस्पर्शी आणि सुश्राव्य कीर्तन सादर करून उपस्थित भाविकांना आध्यात्मिक आनंद दिला.याप्रसंगी डॉ. विनिता गोरे-पाटील, पायलट रुतुजा बोडके-पाटील, येसूबाई अजिंक्यराणा पाटील यांच्यासह परिसरातील पुरुष व महिला भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.ठिक १२ वाजता रामजन्माचा पाळणा उपस्थित महिलांनी भक्तिभावाने गाऊन उत्सवाचा मुख्य क्षण साजरा केला. यानंतर सुंठवड्याचे वाटप करण्यात आले. शेवटी उपस्थित भाविकांना महाप्रसाद वाटप करून उत्सवाची सांगता करण्यात आली.



# भारत टॅलेंट सर्च परीक्षेत येनोली (माल) शाळेचे २१ पैकी १९ विद्यार्थी उत्तीर्ण; जिल्हा स्तरावर उल्लेखनीय यश

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

भारत टॅलेंट सर्च २०२५ परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, नागभीड तालुक्यातील येनोली (माल) येथील जिल्हा परिषद शाळेने या परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी करत शैक्षणिक गुणवत्तेचे उत्तम उदाहरण सादर केले आहे. एकूण २१ विद्यार्थ्यांनी परीक्षेला बसून त्यातील १९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.विशेष म्हणजे, प्रथम वर्गातील कार्तिक रामदास बोरकर याने जिल्हास्तरावर दहावा क्रमांक मिळवला आहे. तृतीय वर्गातील माही विवेक शेंडे हीने केंद्रात तिसरा क्रमांक, तर सातवीतील अखिल शामराव मसराम याने जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.



या यशाबद्दल विद्यार्थ्यांनी आपले मार्गदर्शक शिक्षकवृंद, विशेषतः शिक्षिका करुणा सोनटक्के, तसेच आपल्या आईवडीलांचे मन:पूर्वक आभार मानले. येनोली (माल) शाळेच्या या यशामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण आहे.

# श्रीक्षेत्र गोळवाडी येथील साई दिंडीला शिर्डी संस्थानचा अधिकृत सन्मानपत्र प्रदान

## पंधरा वर्षांच्या समर्पित परंपरेचा गौरव; ग्रामस्थांकडून संस्थानचे आभार

**वैजापूर । अर्जुन शिंदे**

वैजापूर तालुक्यातील श्रीक्षेत्र गोळवाडी ते श्रीक्षेत्र शिर्डी या मार्गावर गेल्या १५ वर्षांपासून सातत्याने आयोजित होणाऱ्या साई पालखी दिंडीला यंदा शिर्डी साईबाबा संस्थानच्या वतीने अधिकृत सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. शिर्डी साईनगरीत पालखी पोहोचताच संस्थानने पारंपरिक सन्मानाने स्वागत करत, पंधरा वर्षांपासून सुरु असलेल्या या दिंडी सोहळ्याचा गौरव केला.

श्रीरामनवमीच्या निमित्ताने गोळवाडी (रामनगर) येथून निघालेली ही पालखी सोहळा केवळ श्रद्धेचा नव्हे तर ग्रामसमूहाच्या एकोप्याचा आणि सेवा परंपरेचा उत्कट नमुना ठरतो. दिंडीदरम्यान विविध भाविकांनी अन्नदान व अन्य सेवा कार्यात योगदान दिले.

नाश्त्याची व्यवस्था भाऊसाहेब पाटील पगार व सुभाष (मामा) गायकवाड, दुपारी भोजन प्रमोद आवारे, चहा विक्रम शिंदे, किरण पगार, संकेत मिसाळ, भाऊसाहेब शिंदे, वाल्मीक पगार, सागर शिंदे, संध्याकाळचे भोजन सचिन ताजी यांच्यावतीने करण्यात आले. रामनवमी दिवशी फराळाची व्यवस्था गणेश पगार, सुनील पगार, राजू चव्हाण, अविनाश वाकचौरे, चेतन पगार यांनी केली, तर कोल्ड्रिंकची सेवा सुदाम ताजी, प्रवीण ठोंबरे, दादासाहेब पगार, संतोष भक्कड, एकनाथ व स्वराज मांजरे, गणेश पगार यांनी केली.शिर्डी येथे फ्रुट्स व कोल्ड्रिंक्सची व्यवस्था राज सुराशे, आकाश शिंदे, साई महेश पगार यांनी केली. तसेच वाहन व्यवस्थेसह अनेक ग्रामस्थांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सेवा कार्यात मोलाचे योगदान दिले.या सर्व भाविकांचे व सेवेकऱ्यांचे ग्रामस्थांच्या वतीने विशेष कौतुक करण्यात आले असून, शिर्डी संस्थानच्या सन्मानाबद्दल संपूर्ण गोळवाडी ग्रामस्थांनी मन:पूर्वक आभार व्यक्त केले आहेत.




# हिमालयीन समर्पण ध्यानाच्या माध्यमातून संत ज्ञानेश्वर महाराजांनी सांगितलेल्या आत्मधर्माची अनुभूती

## आळंदी येथे १० ते १२ एप्रिल दरम्यान नि:शुल्क ध्यानयोग शिबिराचे आयोजन

**कोल्हार । प्रतिनिधी**

संत ज्ञानेश्वर महाराजांनी सांगितलेल्या आत्मधर्म, विश्वधर्म व आत्मानुभूतीच्या मार्गावर नेणारे हिमालयीन समर्पण ध्यान महाशिबिर येत्या १० ते १२ एप्रिल २०२५ दरम्यान, संध्याकाळी ५ ते ८ या वेळेत आळंदी येथील मुंबई मराठा फ्रुटवाला धर्मशाळा ग्राउंडवर पार पडणार आहे. श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी, आळंदी आणि श्री शिवकृपानंद स्वामी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हे नि:शुल्क शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

आजच्या तणावपूर्ण जीवनशैलीत शांती, समाधान आणि आत्मसाक्षात्काराच्या शोधात असलेल्या साधकांसाठी हे शिबिर एक सुवर्णसंधी ठरणार आहे. 'ध्यान हे दुःख दूर करण्याचे साधन आहे, आणि ते आपल्या आत आहे' - या तत्त्वज्ञानावर आधारित हे ध्यानशिबिर जिवंत सद्गुरूंच्या सानिध्यात होणार असून, आत्मभाव जागृत करण्याचा अनुभव साधकांना मिळणार आहे.सद्गुरु श्री शिवकृपानंद स्वामी यांनी हिमालयात १६ वर्षे कठोर साधना करून कैवल्यकुंभक योगी, जैन मुनी व इतर हिमालयीन गुरूं कडून दिव्य ज्ञान प्राप्त केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली भारतासह जगातील ७२ देशांतील लोकांनी समर्पण ध्यानयोग आत्मसात केला आहे.हे शिबिर आत्मधर्माची प्रत्यक्ष अनुभूती देणारे असून, संत ज्ञानेश्वर महाराजांच्या विचारांना समर्पित आहे. इच्छुकांनी अधिक माहितीसाठी ९६६५७९५६७८ / ९१३७२४७९३३ या क्रमांकावर संपर्क साधावा.



# नाफेड अंतर्गत शासकीय हरभरा खरेदीस सुरुवात

## मिस्कीन स्वामी प्रोड्यूसर कंपनीच्या माध्यमातून हमीभाव योजना प्रभावी



**गंगाखेड । प्रतिनिधी**

इसाद येथील मिस्कीन स्वामी ग्रो प्रोड्यूसर कंपनी लिमिटेडमध्ये नाफेड व महा किसान संघ कृषी प्रोड्यूसर कंपनी लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमानाने शासकीय हमीभाव योजनेअंतर्गत हरभऱ्याची नोंदणी व खरेदी सुरू करण्यात आली आहे.

या शासकीय उपक्रमाचा लाभ जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी घ्यावा, असे आवाहन मिस्कीन स्वामी प्रोड्यूसर कंपनीचे चेअरमन भिमाशंकर लोखंडे यांनी केले आहे. खरेदीसाठी शेतकऱ्यांना आपली नोंदणी करणे आवश्यक असून, त्यासाठी ७/१२ उतारा, खरीप पिक नोंदणी (चालू वर्ष), आधार कार्ड, बँक पासबुक आदी कागदपत्रांची आवश्यकता आहे.या वर्षी हमीभाव ५६५० रुपये प्रति क्विंटल इतका निश्चित करण्यात आला असून, हा उपक्रम 'पीएसएस योजना २०२४-२५' अंतर्गत राबविण्यात येत आहे. इच्छुक शेतकऱ्यांनी नोंदणीसाठी ९९२२७७७३११ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहनही लोखंडे यांनी केले आहे.

# कापूस विशेष प्रकल्पाअंतर्गत शेतकरी मेळावा के.व्ही.के.सेलसुरा येथे संपन्न

**वर्धा । प्रतिनिधी**

भारत सरकारच्या केंद्रीय कृषि मंत्रालय व वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या सहाय्याने देशातील कापूस उत्पादन वाढविण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या 'कापूस विशेष प्रकल्पा' अंतर्गत दिनांक १९ मार्च २०२४ रोजी के.व्ही.के. सेलसुरा, जिल्हा वर्धा येथे भव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्याचे आयोजन 'कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन टेक्स्टाइल इंडस्ट्रीज - कॉटन डेव्हलपमेंट अँड रिसर्च असोसिएशन' (सी.टी.सी.डी.आर.ए.), मुंबई यांच्या वतीने करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी के.व्ही.के. सेलसुरा येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. जीवन कतोरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बाबासाहेब फंड, डॉ. शैलेश गावंडे (सी.आय.सी.आर. नागपूर), गोविंद वैराळे (प्रकल्प समन्वयक, सी.टी.सी.डी.आर.ए.), डॉ. पवार मॅडम, डॉ. अंकिता अंगाईतकर (के.व्ही.के. सेलसुरा) यांची उपस्थिती होती.




प्रास्ताविक भाषणात गोविंद वैराळे यांनी महाराष्ट्रातील वर्धा, नागपूर व यवतमाळ या जिल्ह्यांत राबविण्यात येणाऱ्या कापूस विशेष प्रकल्पाची माहिती दिली. या प्रकल्पांतर्गत वर्धा जिल्ह्यात ४१५ हेक्टर, नागपूरमध्ये ४९० हेक्टर व यवतमाळमध्ये ६० हेक्टर क्षेत्रावर विशेष कार्यवाही करण्यात येणार आहे.डॉ. जीवन कतोरे यांनी शेतकऱ्यांना कोरडवाहू परिस्थितीत सघन कापूस लागवडीद्वारे उत्पादन वाढविण्याच्या पद्धतींबाबत मार्गदर्शन केले. डॉ. शैलेश गावंडे यांनी अतिघन लागवड, साधारण पद्धतीतील फरक, योग्य बियाण्याचे प्रमाण, तसेच झाडांची वाढ नियंत्रित करण्यासाठी 'मेपिक्वेट क्लोराईड' चा वेळेवर वापर याविषयी माहिती दिली.

डॉ. बाबासाहेब फंड यांनी गुलाबी बोंडळीच्या एकात्मिक व्यवस्थापनावर, तसेच कीड नियंत्रणासाठी फवारणी करताना घ्यावयाच्या दक्षतेबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.कार्यक्रमात वर्धा जिल्ह्यातील सात तालुक्यांतील शेतकऱ्यांना तसेच कापूस विस्तार सहाय्यकांना सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमित कावडे (प्रकल्प अधिकारी) यांनी तर आभार प्रदर्शन जगदीश नेरालकर (प्रकल्प अधिकारी) यांनी केले.कार्यक्रमाला मोहन करणाके, विशाल घोडाम, विशाल गोबडे, प्रभाकर चंभारे, रवी टिपले, मनोज किटे, सदाशिव शर्माके, अनिल अवथले, वैभव पोहनकर, अर्तेश खोकले, सौरभ भोयर व इतर अनेक कापूस विस्तार सहाय्यकांची उपस्थिती होती.या शेतकरी मेळाव्यास वर्धा जिल्ह्यातील अनेक तालुक्यांतून शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घेतला.

## देवळी येथील पुनर्वसन ला समस्यांचा विळखा

# गेल्या सहा महिन्या पासून नळ योजनेचा वीज पुरवठा खंडित

**देवळी । प्रतिनिधी**

देवळी येथील पुनर्वसन मध्ये समस्यांचा विळखा पडला असून नागरिकांना पाण्याकरिता वणवण करावी लागत आहे येथील रस्ते, नाल्या पथदिवे यांची मोठी समस्या आहे.उन्हाळात पाण्याची मोठी समस्या निर्माण झाली आहे. बोरगाव, हरीशवाडा, भादोड हे आर्वी तालुक्यातील गावे निम्म वर्धा प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्राखाली गावठाण व जमिनी शासनाने संपादित केली असून देवळी येथे पुनर्वसन भूखंड नागरिकांना देण्यात आले सन २००७-०८ मध्ये शासनाच्या आदेशावरून जिल्हा पुनर्वसन विभागा कडून गावठाण स्थलांतरित करण्यात आले बोरगाव पुनर्वसन अंतर्गत हरीशवाडा, भादोडगेल्या १८ वर्षापासून प्रकल्पग्रस्त नागरिक देवळी पुनर्वसन येथे वास्तव्य करीत आहे परंतु अजूनही या गावठाणाला ग्रामपंचायत दर्जा मिळाला नाही ना ग्रामपंचायत, ना सरपंच, ना सचिव नागरिकांनी समस्या मांडायला जायचे कुठे हा प्रश्न विचारला जातो वीज पाणी, नाल्या, रस्ते स्मशानभूमी अविकसित आहे. ग्रामपंचायत नसल्यामुळे नागरिक शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित आहे तर जन्म मृत्यू विवाह नोंद कुठे करायची हा सुद्धा प्रश्न उभा राहतो.

पुनर्वसन मध्ये आज १५०० ते १६०० लोकसंख्या





असून गावठाण मधील सर्व भूमिहीन नागरिक सचिव नसल्यामुळे घरकुल विद्यार्थ्यांना लागणारे दाखले बांधकाम कामगार दाखला मिळत नसून गेल्या पंधरा वर्षापासून पुनर्वसन ग्रस्तांना शासकीय लाभापासून वंचित ठेवण्यात आले आहे गेल्या सहा महिन्यापासून वीज देयक न भरल्याने पुनर्वसन मधील पाणीपुरवठा बंद आहे गेल्या एक वर्षापासून पथदिवे बंद आहे तर नाल्या तुडुंब भरले असून घाणीचे साम्राज्य आहे येथे बोरवेल काही चालू तर काही बंद अवस्थेतच आहे स्मशानभूमी वरील पत्रे संपूर्ण सडले आहे गावात ग्रामपंचायत इमारत बांधून तयार आहे पण तिला दर्जा मिळालेला नाही.

जिल्हा पुनर्वसन विभागाने गावठाण मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वर्धा यांना हस्तांतरित (वर्ग) केले आहे परंतु आर्थिक नियोजन (निधी) उपलब्ध नाही असे सांगण्यात येते. गेल्या कित्येक वर्षापासून येथील नागरिक शासकीय अधिकारी,नेते यांच्याकडे निवेदन देऊनही काही उपयोग झाला नाही असे येथील नागरिक सांगतात. येथील शेतकऱ्यांचे जमिनी धरणाकरता संपादित करून हेक्टरी ४२ ते ४५ हजार रुपये मोबदला दिला काही शेतकऱ्यांचे मोबदल्याबाबत प्रकरण गेल्या दहा वर्षापासून न्यायप्रविष्ठ आहे.

आज पुनर्वसन वस्तीमध्ये रस्ते फुटले असून नाल्या घाणीने भरले आहे तर बहुतांश पथदिवे बंद आहे नळ योजनेची वीज कापल्यामुळे सहा महिन्यापासून पाणीपुरवठा बंद आहे तर स्मशानभूमीची हालत ही खराब आहे.

सर्व प्रकल्पग्रस्त नागरीक रास्ता रोको आंदोलन उपोषण करण्याच्या तयारीत असून येणाऱ्या सार्वजनिक निवडणुकीत प्रकल्पग्रस्तांचा मतदानावर बहिष्कार राहील असे निम्म वर्धा प्रकल्पग्रस्त कृती समितीचे अध्यक्ष मनोहर गवळी व मंगेश वानखेडे विनोदराव कदम कैलास नागपुरे विनोद राऊत कैलास विखे यांनी सांगितले. शासनाने या प्रकल्पग्रस्त नागरिकांच्या समस्यांकडे लक्ष देणे अत्यंत आवश्यक असून तत्काळ उपायोजना करणे गरजेचे आहे.

# रामनवमी उत्सव खडकी हनुमान मंदिरात मोठ्या उत्साहात साजरा




**खडकी । प्रतिनिधी**

खडकी येथील हनुमान मंदिर देवस्थान येथे दरवर्षी प्रमाणे यंदाही रामनवमीचा पवित्र उत्सव मोठ्या थाटामाटात व भक्तिभावाने साजरा करण्यात आला. मंदिर परिसर सुशोभित करण्यात आला होता आणि भाविकांनी मोठ्या संख्येने दर्शनासाठी उपस्थिती दर्शवली.या वेळी हनुमान मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष श्रीमान केशरी चंदजी खंगारे, सचिव श्रीकृष्ण भंडारे, संजय सोनटक्के, सुधाकर भंडारे, जानबाजी शेन्द्रे यांच्यासह खडकी ग्रामपंचायतीचे सरपंच राजेश लोनकर, माणिक देडे, प्रेमदास परतेकी, छायाताई धुर्वे आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमात धार्मिक पूजन, भजन, कीर्तन तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामस्थ आणि भाविकांनी या कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. संपूर्ण वातावरण भक्तिमय झालं होतं.या यशस्वी आयोजनाबद्दल ग्रामस्थांनी मंदिर समितीचे व सर्व स्वयंसेवकांचे विशेष कौतुक केले.

## गावातील अवैद्य दारुविक्री बंद करण्या साठी रणरागिणी उतरणार रस्त्यावर

**सगरोळी । प्रतिनिधी**

पिंपळगाव कुं. दारुडे पती व मुले यांच्यामुळे संसाराची राख रांगोळी होत आहे. बायकांनी ऊन, वाऱ्यात कष्ट्राने कमवून आणलेले पैसे हे दारुडे मारहाण करुन हुसकून घेतात आणि दारुत उडवतात. याला केवळ गावातील दारु अड्डे,कारणीभूत आहेत. तेव्हा ग्रामपंचायतने त्तरित गावातील अवैध धंदे बंद करावेत. अन्यथा महिला तीव्र आंदोलन छेडणार व अड्डु,वाल्यांना धडा शिकवल्या शिवाय राहणार नाही, असा इशारा पिंपळगावातील रणरागिनीनी दिला आहे. बिलोली तालुक्यातील पिंपळगाव सह परिसरातील आपल्या घरातील व्यसनाधीन दारुड्यांना वैतागलेल्या गोरगरीब महिलांनी एकत्र येत आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या.आपली कैफियत मांडताना म्हणाल्या, की गावातील अवैद्य होत असलेली दारू विक्री व संत कबीर विद्यालयात रोज सांयकाळी ६.ते रात्री १०वाजे.पर्यत शाळेच्या मागे तळीरामाची बैठक चालु आहेत. त्वरित बंद करा. महिला, मुलांची छळवणूक व उपासमार थांबवा. हे दारुडे घरातील धान्य, किराणा सामान, भांडीकुंडीही कवडीमोल भावात विकून दारू पितात. महिला मुलांना मारहाण करतात. बनवलेले, शिजवलेले अन्न फेकून देतात. खाऊ दिले जात नाही. घराची शांतता यामुळे भंग होत आहे. काबाडकष्ट करूनही गरिबी व दारिद्र्य हटत नाही. हे केवळ गावात असलेल्या दारू अडेड्य आणि अवैध धंद्यांमुळे होत असून याचा ताबडतोब बंदोबस्त करा. अशी जोरदार मागणी, गावातील प्रत्येक महिलांनी केला आहे. पिंपळगाव कुं गावातील महिला सरपंच, सौ. रुक्मीनबाई शामराव होनपारखे यांना भेटून आशा पध्दतीचा ठराव करु.

## शिरोळमध्ये पाण्यासाठी आंदोलन




**कोल्हापूर । प्रतिनिधि**

शिरोळ नगरपालिकेतील पाणी योजनेचे काम रेंगाळल्याने सर्वपक्षीयांनी नगरपालिकेसमोर आंदोलन केले. याबाबत तातडीने मार्ग काढण्याचे आश्वासन प्रभारी मुख्याधिकाऱ्यांनी दिले. तर कामात सुधारणा झाली नाही तर मंगळवारपासून बेमुदत आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला. शिरोळ शहरासाठी केंद्र सरकार पुरस्कृत अमृत योजनेअंतर्गत २६ कोटी ६८ लाख रुपये खर्चाची पाणीपुरवठा योजना मंजूर झाली आहे. हे काम ईगल इंडिया उल्हासनगर या ठेकेदार कंपनीला एक टक्का जादा दराने देण्यात आले आहे. योजनेच्या कामाची मुदत संपली तरीही काम रेंगाळलेले आहे. परिणामी कृष्णाकाठी असूनही शिरोळकरांना पाण्यासाठी भटकंतीची वेळ आली आहे या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी युवा नेते पृथ्वीराज यादव, दत्त कारखान्याचे संचालक दरगु गावडे, शिवप्रतिष्ठानचे अध्यक्ष रावसाहेब देसाई, माजी सरपंच गजानन संकपाळ आदींनी हे आंदोलन केले.

# शेतकऱ्यांना कर्जमाफीचं आश्वासन देऊन सरकारने केला विश्वासघात-डॉ.हेमंत इसनकर यांचा आरोप

## १४ एप्रिलला महायुतीच्या जाहीरनाम्याची होळी करणार-शेतकरी संघटनेची घोषणा

**चिमूर । शेषराव राऊत**

२०१९ मध्ये दिलेली कर्जमाफीची हमी पाळण्यात सरकार अपयशी ठरल्याने महाराष्ट्रातील शेतकऱ्यांशी विश्वासघात झाला आहे, असा आरोप शेतकरी संघटनेचे विदर्भ प्रदेशाध्यक्ष डॉ. हेमंत इसनकर यांनी केला. १४ एप्रिल रोजी महायुतीच्या निवडणूक जाहीरनाम्याची होळी करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी पत्रकार परिषदेत दिली.

२०१९च्या विधानसभेच्या निवडणुकीत भाजप व महायुतीने सत्तेवर आल्यास राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचं ठोस आश्वासन दिलं होतं. मात्र, १० मार्च २०२५ रोजी अर्थसंकल्प सादर करताना अर्थमंत्री अजित पवार यांनी राज्याच्या आर्थिक परिस्थितीचा हवाला देत कर्जमाफी शक्य नसल्याचं स्पष्ट केलं. एवढंच नाही, तर बँकांना कर्जवसुलीचे आदेश देण्यात आले आणि शेतकऱ्यांना ३१ मार्च २०२५ पर्यंत परतफेडीची अंतिम मुदत जाहीर करण्यात आली.या भूमिकेवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही अर्थमंत्र्यांचं विधानच सरकारची अधिकृत भूमिका असल्याचं मान्य केलं. दरम्यान, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी देखील जाहीरनाम्यात कर्जमाफीचं आश्वासन दिलं गेलं होतं, अशी कबुली दिली.

या पार्श्वभूमीवर शेतकरी संघटना आणि स्वतंत्र भारत पक्षाने सरकारवर कलम ४२० अंतर्गत फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.राज्यात सध्या कापूस, तूर, चणा, सोयाबीन यांचे दर किमान आधारभूत किमतीपेक्षा (चडझ) कमी असून, उउख आणि नाफेडकडे संपूर्ण माल खरेदी करण्याची यंत्रणा सक्षम नाही. परिणामी शेतकऱ्यांना कवडीमोल दरात आपला माल विकावा लागत आहे. गेल्या दोन दशकांत कर्जबाजारीपणामुळे राज्यात ४७ हजारांहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून, विदर्भात हे सत्र सुरूच आहे.शेतकरी संघटना आणि स्वतंत्र भारत पक्ष सरकारच्या या धोरणांचा तीव्र निषेध करत असून, १४ एप्रिल रोजी महायुतीच्या जाहीरनाम्याची होळी करण्यात येणार आहे, अशी माहिती चिमूर तालुक्याचे शेतकरी संघटना प्रमुख मोरेश्वर झाडे, सुभाष खानोरकर, महादेव ननावरे, अरुण भोयर, गणेश कारेकर, धर्मादास मोटकर, अरविंद सोनटक्के, बबलू थुटे, सुनील कारेकर आणि इतरांनी दिली.

## हिंगणघाटमध्ये रामनवमी निमित्त स्वच्छता मोहिमेचा अनोखा उपक्रम

### राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व स्व.आप्पाजी जोशी सेवान्यास हिंगणघाट यांच्या संयुक्त विद्यमाने राबवण्यात आली स्वच्छता मोहीम

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

दिनांक ६ एप्रिल २०२५ रोजी रामनवमी निमित्त हिंगणघाट शहरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व स्वर्गीय आप्पाजी जोशी सेवान्यास यांच्या संयुक्त विद्यमाने एक आगळावेगळा आणि अनुकरणीय उपक्रम राबवण्यात आला. रामनवमी शोभायात्रेदरम्यान रस्त्यांवरील स्वच्छता राखण्यासाठी विशेष मोहिम आखण्यात आली होती.यावर्षी रामनवमीचा उत्सव शहरात मोठ्या उत्साहात साजरा झाला. विविध वॉर्डांमधून आकर्षक झाक्या, भजन मंडळे, देखावे आणि संदेश फलकांनी शोभायात्रा अधिकच रंगतदार झाली होती. संभाजी महाराजांची झाकी विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली. संपूर्ण हिंगणघाट शहर प्रभू रामचंद्राच्या जयघोषाने भगवामय झाले होते.



शोभायात्रेदरम्यान नागरिकांसाठी महाप्रसाद, शरबत, कुल्फी इत्यादींचे वाटप विविध चौकांमध्ये मोठ्या प्रमाणावर करण्यात आले. मात्र, या दरम्यान तयार होणारा कचरा रस्त्यावर राहू नये, यासाठी स्वयंसेवकांनी एक अभिनव उपक्रम हाती घेतला. रॅलीच्या मागे राहून त्यांनी प्लेट्स, ग्लासेस व इतर कचरा उचलून परिसर स्वच्छ ठेवला. हा उपक्रम इतका प्रभावी ठरला की रॅली झालेल्या प्रत्येक भागात कुठेही कचरा शिल्लक राहिला नाही.या उपक्रमात स्वयंसेवकांसोबत नागरिकांनीही पुढाकार घेतला. हिंगणघाट नगरात पहिल्यांदाच अशा पद्धतीची स्वच्छता मोहीम राबविण्यात आल्याने सर्व स्तरातून कौतुक होत आहे.या मोहिमेत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संघचालक जेठानंद राजपूत, जिल्हा सहकार्यवाह त्रिशूल लोंढेकर, हिंगणघाट नगर कार्यवाह श्याम मेघरे, नगर सहकार्यवाह पंकज आत्राम, सेवा टोळी प्रमुख समीर धारकर, ईशांत खंदार,किशोर कोसुरकर, प्रमोद हंबर्डे,अजय वानखेडे,परागजी आजनसरे, नेहाल गंडाईत, पवन कोल्हे, अंजेश पांडे, रितेश भाताडे, सौरव वसू इत्यादी कार्यकर्ते सहभागी झाले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेनंतर अशा प्रकारच्या सामाजिक उपक्रमात भविष्यातही मोठ्या प्रमाणावर सहभाग घेण्याचा निर्धार स्वयंसेवकांनी व्यक्त केला.

## श्रीराम नवमी निमित्त धाबा उपपोलीस स्टेशनमध्ये वृक्षारोपण



**गोंडपीपरी । प्रतिनिधी**

श्रीराम नवमी निमित्त उपपोलीस स्टेशन, धाबा येथे भारतीय जनता पार्टी, धाबा तर्फे वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात सामाजिक व पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

या कार्यक्रमाला माजी जिल्हा परिषद सदस्य अमर बोडलावार, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती स्वप्नील अनमुलवार, भाजयुमो सोशल मीडिया जिल्हा संयोजक आशिष मामीडपेल्लीवार, भाजपा युवा नेते निखिल चंदनगिरीवार, विठ्ठल चनकापुरे यांच्यासह संतोष गरपल्लीवार, हरीश घोगरे, विशाल बावणे, सुरज फरकडे, प्रणय हजारे, राकेश हजारे, अभय वाघाडे यांची उपस्थिती लाभली. तसेच उपपोलीस स्टेशन, धाबा येथील सर्व कर्मचारीही या उपक्रमात सहभागी झाले होते.कार्यक्रमादरम्यान विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. उपस्थितांनी पर्यावरण रक्षणासाठी वृक्षारोपणाचे महत्त्व अधोरेखित केले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .